## (देशी कट्टा व काडतुस बाळगणारा पोलीसांचे जाळयात)
## स्थानिक गुन्हे शाखा, बुलडाणा ची कार्यवाही.

बुलडाणा जिल्हयाचे मा. पोलीस अधीक्षक डॉ. दिलीप पाटील-भुजबळ , मा. अपर पोलीस अधीक्षक, डॉ संदीप पखाले, यांचे आदेशानुसार बुलडाणा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेंद्र देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान कोणतेही अनुचीत प्रकार घडू नये शांतता व सुव्यवस्था विस्कळीत होवु नये या करीता स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि पी.आर इंगळे यांचे नेतृत्वाखाली पो.हे.कॉ श्रीकृष्ण चांदुरकर, शेख साजीद, पो.कॉ. संदीप मोरे, विजय सोनुने, चालक भगतसिंग राजपुत सह पो.स्टे. जानेफळ हद्दीत पेट्रोलींग करत असतांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन नायगांव दत्तापुर पुलावर नाकाबंदी करुन हिरोहोन्डा पॅशन कंपणीची मो.सा एम.एच.२८-एस-५३३७ नंबरच्या दुचाकी स्वारची नायगांव दत्तपुर नजीक रस्त्यावर पुलाजवळ वाहन थांबवुन त्यांस ताब्यात घेवुन झडती घेतली असता त्याचे ताब्यात देशी बनावटीचे गावठी पिस्टल मॅगझीन व चार जीवंत राऊंडसह मिळुन आले. चौकशी दरम्यान दुचाकीस्वारने आपले नाव सतनामसिंग प्रतापसिंग बावरी वय ३० वर्ष रा.शेंदला ता. मेहकर असे सांगीतले. त्याचे कब्जातुन नमुद देशी कट्टा व जीवंत राऊंड व वाहन (मो.सा) असा ५०,८००/- रु चा माल जप्त करुन त्याचेवर भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ सह म.पो.का १३५ प्रमाणे पो.स्टे जानेफळ येथे कार्यवाही करण्यात आली.

(पी.आर इंगळे)
स.पो.नि.स्थागुशा
बुलडाणा


POLICE-STATION
JANEPHAL
PHON
262533
सत्यमेव जयते